Maharashtra State Board of Secondary and Higher SecondaryEducation,
Kolhapur Divisional Board Kolhapur-416004
**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर - ४१६००४.**

Phones : Chairman 2690829 Secretary 2691405 PBX-2696101,2696102,2696103
E-Mail: divsec.kop@gmil.com Web : sscboardkolhapur.in

कोविमं/डीपी/प्रकटन/ 1165
दिनांक - २८/०७/२०२३

प्रति,
०१) मा. जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी,
जिल्हा माहिती व प्रसिध्दी कार्यालय,
सातारा / सांगली / कोल्हापूर.
०२) मा. संचालक,
आकाशवाणी केंद्र,
सातारा / सांगली / कोल्हापूर.
०३) मा. संचालक,
बी न्यूज कोल्हापूर.
०४) मा. संचालक,
एस न्यूज, कोल्हापूर.
०५) मा. संपादक,
दै. पुढारी / सकाळ / तरुण भारत / लोकमत / पुण्यनगरी
सातारा / सांगली / कोल्हापूर.

**विषय:- माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इ. १० वी) जुलै-ऑगस्ट २०२३ परीक्षेमधील दि.२८/०७/२०२३ रोजीच्या वेळापत्रकातील बदलाबाबत.**

माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) पुरवणी परीक्षा दि.१८/०७/२०२३ ते ०१/०८/२०२३ या कालावधीत आयोजित करण्यात आलेली आहे. तथापि, राज्यातील काही जिल्हयामध्ये दि.२८/०७/२०२३ रोजी अतिवृष्टीचा इशारा देण्यात आलेला आहे. सबब जुलै-ऑगस्ट २०२३ पुरवणी परीक्षामधील दि.२८/०७/२०२३ रोजीच्या वेळापत्रकातील बदलाबाबतचे सोबत जोडलेल्या प्रकटनाची प्रत या पत्रासोबत जोडली आहे. सदर प्रकटनास आपल्या लोकप्रिय दैनिकातून तसेच आकाशवाणी व दुरदर्शन केंद्रानी त्यांच्या प्रादेशिक बातम्यातून विनामुल्य प्रसिध्दी देण्याची व्यवस्था करावी ही विनंती.

**(डी. एस. पोवार)**
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

सोबत: प्रकटन

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) जुलै–ऑगस्ट २०२३ पुरवणी परीक्षेच्या वेळापत्रकातील बदलाबाबत

# प्र क ट न

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत जुलै–ऑगस्ट २०२३ मध्ये घेण्यात येणारी माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ. १० वी) दि. १८/०७/२०२३ ते दि. ०१/०८/२०२३ व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) पुरवणी परीक्षा दि. १८/०७/२०२३ ते दि. १०/०८/२०२३ या कालावधीत आयोजित करण्यात आलेली आहे. त्यानुसार सदर परीक्षेचे वेळापत्रक मंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले असून शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना देण्यात आलेले आहे तथापि राज्यातील काही जिल्हयामध्ये दि. २८/०७/२०२३ रोजी अतिवृष्टीचा इशारा देण्यात आलेला आहे.

सबब माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ. १० वी) पुरवणी परीक्षेतील दि. २८/०७/२०२३ रोजीच्या वेळापत्रकामध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे.

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ. १० वी)

| वेळापत्रकामध्ये निश्चित केलेला दिनांक<br>विषय, वार, दिनांक, सत्र व वेळ | वेळापत्रकाबाबत सुधारीत तपशील<br>विषय, वार, दिनांक, सत्र व वेळ |
|---|---|
| सामाजिक शास्त्रे पेपर १<br>इतिहास व राज्यशास्त्र<br>शुक्रवार, दि.२८ जुलै २०२३<br>सकाळ सत्र ११.०० ते १.०० | सामाजिक शास्त्रे पेपर १<br>इतिहास व राज्यशास्त्र<br>गुरूवार दि. ०३ ऑगस्ट २०२३<br>सकाळ सत्र ११.०० ते १.००<br>या वेळेत घेण्यात येतील |

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ. १० वी) पुरवणी परीक्षा लेखी व अन्य परीक्षेच्या उर्वरित वेळापत्रकामध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही. तरी वेळापत्रकातील उपरोक्त बदलाची सर्व संबंधित माध्यमिक शाळा, मुख्याध्यापक, विद्यार्थी, पालक, परिरक्षक, केंद्र संचालक व अन्य संबंधित घटक यांनी नोंद घ्यावी.

(अनुराधा ओक)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे –४.

Scanned with OKEN Scanner